**(CNR No.:-MHSO-1900-0241-2024)**
*(गोविंद घागरे Vs. रविकिरण भुरळे व इतर )*

## निशाणी क्र.५ वरील आदेश
## (पारीत दिनांक ०९/०५/२०२४)

प्रस्तुतचा अर्ज वादीने प्रतिवादी यांचे विरुद्ध अंतरीम मनाई हुकूम मिळण्याकरीता दाखल केलला आहे.

०२. वादीचे कथन असे की, दावा कलम १ मधील नमुद मिळकत मौजे मोहोळ, ता.मोहोळ, जि.सोलापूर येथील शेतजमीन यांसी वर्णन व चतुःसिमा खालीलप्रमाणे–

| गट क्रमांक | क्षेत्र | आकार | चतुःसिमा | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | हे.आर. | रु.पैसे | पुर्व | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| ४५१ | ७-०८<br>पो.ख. ०-१४<br>एकुण ७-२२ | २०-८५ | गट क्र.४५२ | ओढा | गट क्र.४४८, ४४९, ४५० | गट क्र.४५१ |

येणेप्रमाणे वर्णनाची शेतजमीन आतील व वृक्षपाषाण वगैरे तदंगभुत वस्तुसहः

(हा या दाव्याचा वाद विषय असून संक्षिप्ततेसाठी यापुढे वर नमुद मिळकतीचा उल्लेख केवळ 'दावा मिळकत' असे करण्यात येईल)

०३. वादीचे कथन असे आहे की, दावा मिळकत एकत्रीकरण योजनेपूर्वी स.नं.१७९ म्हणुन ओळखली जात होती. ती मिळकत गोविंदराव अज्ञानराव देशमुख यांचे मालकीची होती. प्रतिवादींचे वडील रविंद्र मल्लाप्पा भुरळे हे दावा मिळकतीस दि.०१/०४/१९५७ च्या कृषकदिनाच्या पुर्वीपासून कुळ होते व त्यानूसार दावा मिळकतीचे ७/१२ सदरी त्यांचे नाव

नमुद आहे. सदर रविंद्र मल्लाप्पा भुरळे यांचे मृत्युनंतर प्रतिवादींची नावे दावा मिळकतीच्या ७/१२ पत्रकी वारस हक्काने नोंद झाली. गोविंदराव देशमुख हे रविंद्र यांना दावा मिळकतीमध्ये वहिवाटण्यास हरकत करीत होते. त्यामुळे रविंद्र यांनी दावा मिळकत वादीचे वडीलांना विक्री केली व सन १९६४ साली ताबा दिला. वादीचे वडील रामचंद्र यांचे दि.१०/०७/१९७६ रोजी निधन झाले. त्यांचे पश्चात वादी हा दावा मिळकत वहिवाटीत होता. त्याकाळी कोणत्याही मिळकतीचे पुर्व परवानगी शिवाय खरेदीखत होत नव्हते. त्यामुळे प्रतिवादींचे वडील रविंद्र यांनी वादी व त्यांचे भाऊ भगवान व मोहन यांचे हक्कात दि.३०/०९/१९७६ रोजी साठेखताचा दस्त लिहून दिला. त्या कराराचा भाग म्हणुन दावा मिळकत ही वादी व त्या दोघांकडे पूर्वीपासूनच असलेला ताबा कायम केला.

०४. दि.३०/०९/१९७६ रोजीच्या साठेखतातील शर्तीप्रमाणे रविंद्र यांनी वादीला खरेदीखत लिहून दिले नाही. त्यामुळे वादी व त्यांचे भाऊ मोहन व भगवान यांनी रविंद्र यांचेविरुध्द मोहोळ न्यायालयात रे.मु.नं.२३७/१९८८ दावा दाखल केला. तो दावा दि.१४/०२/१९९८ रोजी नामंजूर झाला. मात्र दावा मिळकतीचा ताबा वादी यांचेकडेच होता व आहे. वादीकडून दावा मिळकतीचा ताबा मिळावा म्हणुन प्रतिवादींनी त्याचे व त्याचे भावाविरुध्द कुळ कायद्यातील तरतुदीनूसार उपविभागीय अधिकारी, माढा उप विभाग कुर्डुवाडी यांचेकडे केस क्र.२५/१९८७ दाखल केला व तो अर्ज दि.२९/०३/१९८८ रोजी मंजूर झाला. त्याविरुध्द वादीने महाराष्ट्र महसुल न्यायाधिकारण, पुणे येथे रिव्हीजन अर्ज क्र.MRT/SHV/7/88 (TEN 122/88) दाखल केला व तो देखील नामंजूर झाला. त्याविरुध्द वादीने मा. मुंबई उच्च न्यायालयात रिट पिटीशन क्र.५००७/१९८८ दाखल केला व

तो दि.२१/०१/२००३ रोजी मंजूर झाला व प्रकरण फेरचौकशीसाठी उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडे पाठविण्यात आला. फेरचौकशीमध्ये उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांनी प्रतिवादींचा मुळ कब्जा मागणीचा अर्ज दि.२९/०८/२०१५ रोजी नामंजूर केला. सदर आदेशाविरुध्द प्रतिवादींनी महाराष्ट्र महसुल न्यायाधिकारण, पुणे यांचेकडे रिव्हीजन अर्ज क्र.S/XI/1/2015 दाखल केला व तो न्यायप्रविष्ठ आहे.

०५. अशा प्रकारे दावा मिळकतीचा ताबा अद्याप वादीकडेच असून कोणत्याही सक्षम न्यायालयाने दावा मिळकतीचा ताबा वादीकडून काढून घेतलेला नाही अथवा प्रतिवादींना दिलेला नाही. अशा परिस्थितीत दावा मिळकतीच्या ७/१२ उतारा सदरी प्रतिवादींच्या नावाची नोंद असल्याचा गैरफायदा घेवून दावा मिळतकीचा ताबा वादीकडून दांडगाईने, मनगटशाहीचा वापर करुन बेकायदेशीरपणे घेण्याचा प्रयत्न प्रतिवादी करीत आहेत. याच उद्देशाने प्रतिवादींनी दि.२७/११/२०२३ रोजी वादीस दावा मिळकतीतील पिकास पाणी देण्यास दमदाटी व शिवीगाळी करुन हरकत घेतली आहे. मयत रामचंद्र यांना वादीचे व्यतिरिक्त अन्य दोन मुले मोहन व भगवान तसेच ५ मुली असे वारस आहेत. परंतु ते दाव्यावर सही करण्यास उपलब्ध नसल्याने सदर प्रकरणी त्यांना वादी म्हणुन समाविष्ट केलेले नाही. सबब, वादीने प्रस्तुत अर्जाव्दारे दावा मिळकतीचा ताबा मिळाल्याशिवाय प्रतिवादींनी वादीचे दावा मिळकतीतील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये अशी अंतरीम मनाई हुकूम प्रतिवादी यांचे विरुध्द देण्यात यावी, अशी विनंती केली आहे.

०६. प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांनी वादीचे प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१६ वर म्हणणे दाखल केले. प्रतिवादी क्र.१ ते ३, ६ व ७ यांनी वादीच्या अर्जातील संपुर्ण कथने मान्य

व कबूल नसल्याचे कथन केले आहे. प्रतिवादींच्या कथनानूसार दावा मिळकतचे मुळ मालक गोविंदराव अज्ञानराव देशमुख यांनी सन १९५७ पुर्वीपासून व त्यानंतर प्रतिवादीचे वडील रविंद्र मल्लाप्पा भुरळे हे कसत होते. प्रतिवादी यांचे वडीलांनी दावा मिळकत ३२ ग मुंबई कुळ कायद्याप्रमाणे खरेदी केली व त्याची पुर्ण रक्कम भरलेली आहे. त्याप्रमाणे खरेदीचे प्रमाणपत्र दिलेले असून त्याबाबत गावचे हक्कपत्रकी रविंद्र सुरळे यांच्या नावाची नोंद झालेली आहे. त्यांच्या मृत्युनंतर प्रतिवादी यांची कायदेशीर वारसदार म्हणुन दावा मिळकतीवर गावचे हक्कपत्रकी कायद्याप्रमाणे नोंद झाली. तेव्हापासून ते आजतागायत दावा मिळकतीचे प्रतिवादी हे मालक झालेले असून त्यांचाच प्रत्यक्ष कब्जा आहे. प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये १० बाय १० पत्राचे शेड बांधला असून, त्यावर भुरळे बंधु फॉर्म असा बोर्ड आहे. दावा मिळकतीमध्ये प्रतिवादींनी गहु व ज्वारीचे पिक घेतलेले आहे. त्यामुळे वादीचे मयत वडील रामचंद्र घागरे यांचा दावा मिळकतीशी कोणताही संबंध, ताबा व हित नव्हता व नाही.

०७. वादी व त्यांचे भावडांनी एकमेकांशी संगनमत करुन मोहोळ येथील न्यायालयात रे.मु.नं.२३७/१९८८ दावा साठेखतावरुन खरेदीखत होवून मिळणेकामी दाखल केला होता व त्या दाव्यात वादीने प्रवितादीचे वडील हे दावा मिळकतीचे कुळ म्हणुन होते व दावा मिळकत ही दि.०१/०४/१९५७ पुर्वीपासून प्रतिवादीचे वडील रविंद्र यांचे ताब्यात होती व ते कायद्याने मालक असल्याचे मान्य व कबूल केले आहे. तसेच तो दावा नामंजूर करण्यात आला होता. सदर दाव्याविरुध्द वादीने सोलापूर जिल्हा न्यायालयात सिव्हील अपील क्र.१८९/१९९८ दाखल केला होता. तो ही अपील दि.२६/०२/२००४ रोजी नामंजूर करण्यात आलेला आहे. तथापी सदर अपीलाविरुध्द वादीने उच्च न्यायालयात दाद मागितलेली नाही.

०८. वादीने दावा मिळकतीचा प्रत्यक्ष कब्जा प्रतिवादी यांचाच आहे ही वस्तुस्थिती उघड होईल या कारणाने दाव्याचे कामी मुद्दामहुन मोहन व भगवान तसेच पाच मुली यांना दाव्याचे कामी पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. तसेच वादीने दावा मिळकतीच्या ७/१२ उता–यावरील सर्व धारकांना देखील पक्षकार म्हणुन सामील केलेले नाही. त्यामुळे प्रस्तुत दाव्यास नॉन जॉईंडर ऑफ नेसेसरी पार्टीची बाधा येते. दि.२७/११/२०२३ रोजी कसलीही घटना घडलेली नाही व वादीस दावा दाखल करण्याचे कोणतेही कारण घडलेले नाही. वादीने दाव्याची आकारणी कायदेशीर केलेली नाही व ती चुकीची आहे. त्यामुळे तशी दुरुस्ती केल्याशिवाय वादीचा दावा व तुर्तातुर्त ताकीदीचा अर्ज चालु शकत नाही. सबब, वरील सर्व कारणास्तव वादीचा प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा, अशी विनंती प्रतिवादींनी केली आहे.

०९. अर्ज व म्हणणे यावरुन खालील मुद्दे माझे विचारार्थ निघतात, त्यावरील निष्कर्ष कारणमीमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | वादीच्या लाभात सकृतदर्शनी केस आहे काय ? | होकारार्थी... |
| २. | न्यायाचा तौलनिक कल वादीच्या लाभात असल्याचे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी... |
| ३. | मनाई हुकुम न दिल्यास वादीचे पैशाने न भरुन येणारे अपरिमित असे नुकसान होईल हे वादीने सिध्द केले आहे काय ? | होकारार्थी... |
| ४. | आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमीमांसा

१०. वादीने त्याच्या कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.०४, २०, २५ वर खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः-

१) गट क्र.४५१ चा ७/१२ उतारा.

२) उपविभागीय अधिकारी, पंढरपूर येथील केस क्र.४/२०१० चे प्रकरणातील आदेशाची प्रत.

३) प्रतिवादींनी पुणे येथे दाखल केलेल्या रिव्हीजन अर्जाची प्रत.

४) दि.३०/०९/१९९७ रोजीचे साठेखताची प्रत.

५) महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, पुणे खंडपिठ यांनी दिलेल्या दि.१६/२/२४ रोजीच्या आदेशाची प्रत.

६) साक्षीदार संतोष पोपट खंदारे व नानासाहेब दिगंबर आदलिंगे यांचे प्रतिज्ञापत्र.

७) वादी यांनी प्रतिवादी यांचे विरुध्द मोहोळ पोलीस स्टेशनला दिलेल्या तक्रारी अर्जाची प्रत व तक्रार पोस्टाने पाठवलेली पावती.

११. प्रतिवादी यांनी त्यांचे कथनापुष्ट्यर्थ निशाणी क्र.२२ वर खालील प्रमाणे कागदपत्रे दाखल केली आहेतः-

१) रे.मु.नं.२३७/१९८८ मधील निकालाची प्रत.

२) अपील क्र.१८९/१९९८ मधील निकालाची प्रत.

३) फोटोग्राफ्स.

४) फोटो पावती.

५) सुहास दत्तात्रय कोलारकर यांचे प्रतिज्ञापत्र.

१२. वादीतर्फे वकीलांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ मा.उच्च न्यायालय व सर्वोच्च न्यायालय यांचेकडील पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

१ ***Rame Gowda (D) Lrs. V/s. Varadappa Naidu (D) Lrs. Anr., Appeal (civil)** 7662/1997.* *यामध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाने असे सांगितले आहे की, it is the settled possession or effective possession of a person without title which would entitle him to protect his possession even as against the true owner. The possession which a trespasser is entitled to defend against the rightful owner must be settled possession, extending over a sufficiently long period of time and acquiesced to by the true owner.*

२ **Baban Anantrao Naik V/s. Sau Pramila Uttamrao Yenare & Ors., Appeal No.**31/2010, **decided on** 12/10/2010. यामध्ये मा. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपिठाने असे सांगितले आहे की, *at the time of determination of an application for temporary injunction, the factum of possession would only be the relevant factor. Whether the possession is lawful possession or not would not be the subject matter of enquiry. Even a trespasser in settled possession is entitled for injunction as has been held by the Apex Court in the case of Rame Gowda (D) Lrs. V/s. Varadappa Naidu (D) Lrs. Anr. Once it is admitted that, plaintiff was inducted in possession of the suit property, then the presumption would be in favour of the continuety of possession unless the defendant pleads and proves that the plaintiff was dispossessed.*

१३. प्रतिवादीतर्फे वकीलांनी त्यांच्या कथनाच्या पुष्टयर्थ मा. मुंबई उच्च न्यायालय यांचेकडील पुढील न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे.

**Lotan Ramchandra Shimpi & Ors. V/s. Shankar**

**<u>Ganpat Kayasth</u>** <u>&</u> **<u>Ors</u>**<u>., 1994(4)</u> **<u>Bom</u>**<u>.</u> **<u>C</u>**<u>.</u>**<u>R</u>**<u>.575.</u> सदर कामी मा. मुंबई उच्च न्यायालयाने असे निर्देशीत केले आहे की, agricultural land transferred without permission of Collector is not entitled to protection under Sec. 53A of Transfer of Property Act.

**<u>मुद्दा क्र.१ ते ४ बाबत</u> –**

(वरील सर्व मुद्दे एकमेकांशी संलग्न असल्यामुळे विवेचनाची पुनरावृत्ती टाळण्यासाठी त्याचे विवेचन एकत्र केलेले आहे)

१४. तुर्तातुर्त मनाई हुकुम ही एक समन्वयीक दाद आहे. वादीला मनाई मिळण्यासाठी सकृतदर्शनी केस, न्यायाचा समतोल व अपरिमित नुकसान या बाबी प्रथमदर्शनी शाबीत करणे आवश्यक आहे. प्रस्तुतचा दावा वादीने प्रतिवादींविरुध्द अंतरीम मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. तुर्तातुर्त मनाई अर्जाव्दारे वादी हे दावा मिळकतीमधील शांततामय कब्जे वहिवाटीस हरकत, अडथळा करु नये याकरिता केलेला आहे. वादीच्या कथनावरुन, अभिलेखावरुन व उपलब्ध कागदपत्रांवरुन वादीने प्रतिवादींविरुध्द तुर्तातुर्त मनाई हुकूम मिळण्यासाठी समर्थनीय पुराव्याआधारे सकृतदर्शनी केस सिध्द केली आहे काय हे पाहणे आवश्यक आहे.

१५. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये सन १९८७ पासून सुरु असलेला वाद व त्याअनुषंगाने उपविभागीय अधिकारी, महाराष्ट्र महसुल न्यायाधिकरण, पुणे व मा.उच्च न्यायालय, मुंबई यांच्याकडील वेळोवेळी झालेले आदेश या सर्व बाबी वादी व प्रतिवादी यांना मान्य आहेत. महसुल सदरी प्रलंबित असलेल्या प्रकरणामध्ये मुख्यतः प्रतिवादींचे वडील रविंद्र मुळे हे कुळ कायदा कलम ३२–ग प्रमाणे दावा मिळकतीची ठरलेली रक्कम भरुन कुळ कायदा

कलम ३२–म प्रमाणे मालक झाल्याने तसा दाखला गाव महसुल सदरी नोंद झाला होता परंतु गोविंदराव देशमुख व वादींचे वडील रामचंद्र घागरे यांनी जबरदस्तीने दावा मिळकतीत घुसुन दावा मिळकतीचा ताबा घेतला हा मुख्य विषय होता. म्हणजेच दावा मिळकत वादींचे वडील व त्यानंतर वादी यांचे ताब्यात आहे ही बाब महसुल सदरी दाखल असलेल्या प्रकरणांमध्ये खुद्द प्रतिवादींनीच लेखी कथनांव्दारे मांडलेली आहेत. या अनुषंगाने नि.४ सोबत २ येथे दाखल केलेल्या उपविभागीय अधिकारी, पंढरपूर यांचेकडील दि.२९/०८/१५ रोजीच्या आदेशाची प्रत, रे.दि.मु.क्र.२३७/८८ मधील न्यायनिर्णयाची प्रत व दि.अपील क्र.१८९/९८ मधील न्यायनिर्णयाची प्रत या सर्व निकालांचे अवलोकन केले. त्यावरुन प्रतिवादींनी दावा मिळकतीमध्ये वादींचा कब्जा असुन तो कब्जा प्रतिवादींना मिळावा अशी मागणी केल्याचे दिसून येते.

१६. प्रस्तुत दाव्यामध्ये प्रतिवादींनी नि.१६ येथे दाखल केलेल्या कैफियत व म्हणण्यामध्ये वादीचा दावा मिळकतीमधील कब्जा नाकारलेला आहे. अशा परिस्थितीत महसुल सदरी प्रलंबित प्रकरणांमधील आदेशामध्ये प्रतिवादीस कब्जा मिळाला अथवा इतर कोणत्या कायदेशीर मार्गाने प्रतिवादीस कब्जा मिळाला याबाबत प्रतिवादीन कोणतेही कथन करत नाही. दावा मिळकतीच्या मालकीबाबत वाद असल्याचे वादी–प्रतिवादी मान्य करतात. याठिकाणी वादीने भिस्त ठेवलेल्या मा.सर्वोच्च न्यायालयाच्या रामेगौडा वि. वरदप्पा नायडु या न्यायनिवाड्यातील कायदेशीर तत्वानुसार अतिक्रमण करणा–या व्यक्तीचा दावा मिळकतीतील ताबा देखील कायद्याने संरक्षीत करता येईल. मुळ मालकाने सनदशीर मार्गाचा अवलंब करुन अतिक्रमीत क्षेत्राचा संबंधीत कब्जेदाराकडून ताबा घेणे कायद्याने अभिप्रेत आहे. प्रतिवादींनी

कायदेशीर मार्गाने वादीकडून दावा मिळकतीचा ताबा घेतला याबाबत कोणताही सकृतदर्शनी पुरावा प्रतिवादींनी अभिलेखावर दाखल केलेला नाही.

१७. वादींनी भिस्त ठेवलेल्या वर नमुद मा.मुंबई उच्च न्यायालयाच्या बबन नाईक वि. प्रमिला येणरे या न्यायनिर्णयामध्ये निर्देशांचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज विचारात घेता दावा मिळकतीतील ताबा हाच एकमेव महत्वाचा संबंधीत घटक ठरतो. सदर ताबा कायदेशीर आहे अथवा बेकायदेशीर हा मुद्दा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज विचारात घेताना दुय्यम ठरतो. सदर दावा मिळकतीतील ताबा कायदेशीर आहे अथवा नाही हा मुद्दा दोन्ही बाजुनीं योग्य ते पुरावे दिल्यानंतर सिध्द होणारा असा ठरतो.

१८. प्रतिवादींनी भिस्त ठेवलेल्या वर नमुद लोटन शिंपी वि. शंकर कायस्थ या मा.मुंबई उच्च न्यायालयाकडील प्रकरणामध्ये निर्देशानूसार जिल्हाधिकाराची पुर्व परवानगी न घेता केलेला शेत जमीनीचा व्यवहार हा मालमत्तेचे हस्तांतरण कायद्याच्या कलम ५३–अ प्रमाणे संरक्षीत होत नाही. परंतु, प्रस्तुत दाव्यामध्ये प्रस्तुत अर्जातील वादीची मागणी ही केवळ तुर्तातुर्त मनाई व दावा मिळकतीतील ताबा या संबंधीत आहे. त्यामुळे प्रतिवादींनी भिस्त ठेवलेल्या या निर्देशक तत्वाचा याठिकाणी प्रतिवादीस उपयुक्त ठरत नाही.

१९. प्रतिवादींनी दावा मिळकतीतल त्यांचा ताबा दाखवण्यासाठी काही फोटो दाखल केले आहेत. परंतु, त्यावर कोणतीही तारीख अथवा तपशील नमुद नाही. अशा परिस्थीत ते दावा मिळकतीमध्येच सद्य स्थितीत काढलेले आहेत असा निष्कर्ष काढता येणार नाही. तसेच वादी व प्रतिवादी यांनी आपापला ताबा दाखवण्यासाठी लगत कब्जेदारांची प्रतिज्ञापत्रे सादरी

केली आहेत. परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये दावा मिळकतीतील कब्जाबाबतची कथने महसुल सदरी दाखल असलेल्या प्रकरणांमधुन लिखीत कथनाव्दारे दाखल झाली आहेत व त्याअनुषंगाने सक्षम अधिका–यांचे आदेश देखील प्रस्तुत प्रकरणामध्ये दाखल झाले आहे. त्यामुळे निश्चितच तौलनीकदृष्ट्या लेखी व सक्षम प्राधिकरणाकडील आदेश हे तोंडी प्रतिज्ञापत्राव्दारे केलेल्या कथनांपेक्षा विश्वासार्ह ठरतात.

२०. वरील सर्व विवेचनांनूसार दावा मिळकतीमध्ये वादीचा दिर्घकालीन प्रतिवादींच्या माहितीतील असा ताबा आहे. वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये दावा मिळकतीतील ताब्याबाबत व मालकीबाबत महसुल सदरी प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. दावा मिळकतीचा प्रतिवादींनी कोणत्याही कायदेशीर मार्गाने ताबा घेतलेला नाही. अशा परिस्थितीत वादीचा दावा मिळकतीतील ताबा दाव्याचा अंतिम निकाल लागेपर्यंत अथवा प्रतिवादींनी तो दावा सनदशीर मार्गाने परत मिळवेपर्यंत संरक्षीत करणे कायद्याने अभिप्रेत आहे. त्यामुळे सकृतदर्शनी केस वादीच्या बाजुने आहे. न्यायाचा समतोल देखील वादीच्या बाजुने आहे व वादीचा ताबा संरक्षीत न झाल्यास वादीचे अपरिमित नुकसान होवू शकते. सबब, वादीचे लाभात सकृतदर्शनी केस असुन दाव्याचा समतोल देखील वादीच्या लाभात असल्याचे दिसून येते. त्यामुळे वादीने कथन केल्याप्रमाणे मनाई हुकूम वादीचे लाभात न दिल्यास वादीचे दावा मिळकतीतील कब्जास बाधा निर्माण होवून आर्थिक स्वरुपात नुकसान होण्याची शक्यता नाकारता येणार नाही. याउलट, प्रस्तुतचा तुर्तातुर्त मनाईचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, मुद्दा क्र.१ ते ३ चे निष्कर्ष होकारार्थी नोंदवून मुद्दा क्र.४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे–

## आ दे श

१. अर्ज (निशाणी क्र.०५) मंजूर करण्यात येतो.

२. याव्दारे प्रतिवादींना आदेशीत करण्यात येते की, सदर दाव्याचा निकाल होईपर्यंत सनदशिर मार्गाने दावा मिळकतीचा ताबा मिळाल्याशिवाय वादीचे अगर तर्फे इसमांचे शांततामय कब्जे वहिवाटीस प्रतिवादींनी स्वतः अगर प्रतिवादींचे मार्फत हक्क सांगणारे इसमांनी कोणत्याही प्रकारे हरकत, अडथळा करु वा करवू नये अशी तुर्तातुर्त ताकीद प्रतिवादी यांना देण्यात येते.

३. खर्चाबाबत काहीही आदेश नाही.

**(श्रीमती पी.एस.गोवेकर)**

दिनांक ०९.०५.२०२४ २रे–सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, मोहोळ.

# C E R T I F I C A T E

I affirm that, the contents of this PDF file of Order/Judgment are same word to word as per the original Order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | A.S. Bakale |
| Court | : | $2^{nd}$ Jt. Civil Judge Jr. Division, Mohol. |
| Date | : | 09/05/2024 |
| Judgment signed by the Presiding Officer | : | 09/05/2024 |
| Judgment Uploaded on | : | 10/05/2024 |